साप्रवि व्दारा नियंत्रित वर्ग ३ संवर्गातील अधिकारी / कर्मचा-यांची
विनंती बदल्यांची अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी २०२०

**जिल्हा परिषद नागपूर**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्र.जिपना/साप्रवि/स्था.३/सि.आर.२०/ ३७१८ /२०२०**
**दिनांक: १८/०७/२०२०**

वाचा :- १) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४, दि.१५ मे २०१४
२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन पत्र क्र.जिपब-४८१६/(प्र.क्र.१३८/१६) आस्था.१४ दि. २२.०४.२०१६
३) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/ प्र.क्र.१३६/आस्था.१४ दि. ०२.०१.२०१७
४) कार्यालयीन परिपत्रक क्र.जिपना/साप्रवि/स्था.३/सी.आर.२०/१७०६ दिनांक २८ एप्रिल २०२०
५) कार्यालयीन समक्रमांकांचे पत्र क्र.३५३० दिनांक ०९.०७.२०२०
६) कार्यालयीन समक्रमांकांचे पत्र क्र.३६०६ दिनांक १५.०७.२०२०
७) ग्राम विकास विभागाचे शासन पत्र क्रमांकसंकीर्ण-२०२०/प्र.क्र.२८२/आस्था.१४ दि. ०९.०७.२०२०

**परिपत्रक**

उपरोक्त संदर्भात नमुद शासन निर्णयातील तरतूदीनुसार सन २०२० मध्ये सर्वसाधारण विनंती स्थानांतर करिता संदर्भ क्र.६ अन्वये जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाकडून संनियंजित वर्ग ३ संवर्गातील अनुक्रमे **१) सहाय्यक प्रशासन अधिकारी २) कनिष्ठ प्रशासन अधिकारी ३) विस्तार अधिकारी (सां) ४) लघु लेखक (उच्च श्रेणी) ५) लघु लेखक (निम्न श्रेणी) ६) वरिष्ठ सहाय्यक (लिपीक वर्गीय) ७) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक वर्गीय)** इत्यादी अधिकारी / कर्मचारी तसेच आदिवासी क्षेत्राअंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या संवर्गनिहाय वास्तव्य सेवा जेष्ठता यादया प्रसिध्द करुन त्यावर विहीत मुदतीत आक्षेप मागविण्यात आलेले होते. त्यावर प्राप्त आक्षेप व हरकती / विकल्प विचारात घेवून उपरोक्त प्रमाणे नमुद सर्व संवर्गाच्या विनंती बदलीच्या अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादया यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे संवर्गनिहाय अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादया सर्व संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्या तसेच कार्यालयाचे दर्शनिय ठिकाणी अशा यादया सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात याव्या. सदरची जबाबदारी जिल्हा स्तरावर संबंधित कार्यालय प्रमुख व तालुका स्तरावर (पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत सर्व कार्यालय) संबंधित गटविकास अधिकारी यांचे वर सोपविण्यात येते आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडून संनियंत्रित संवर्गाचे प्रत्यक्ष बदली समुपदेशन मंगळवार दि.२८ जुलै २०२० रोजी सकाळी १०.१५ ते ५.४५ पर्यंत कै.आबासाहेब खेडकर सभागृह जिल्हा परिषद नागपूर येथे आयोजित केले आहे. याबाबतच्या सुचना संबंधित कर्मचा-यास अवगत करुन देण्यात येवून पोच कार्यालयीन अभिलेखात जतन करुन ठेवण्यात यावी. शासन धोरणातील तरतुदी नुसार सोबतच्या वास्तव्य जेष्ठता यादीतील अधिकारी / कर्मचारी प्रत्यक्ष समुपदेशनाला उपस्थित न झाल्यास अशा प्रकरणी शासन तरतुदी नुसार एकतर्फी निर्णय घेण्यात येईल व त्यानंतर त्यांचा कोणताही उजर /हक्क राहणार नाही याची जाणी करुन दयावी.

उपरोक्त प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील संबंधित सहा.प्रशासन अधिकारी किंवा कनिष्ठ प्रशासन अधिकारी यापैकी एकास समुपदेशनाचे ठिकाणी वर सुचित केल्याप्रमाणे पोच पावती व बदल्या संदर्भातील संबंधित कर्मचा-यांच्या सेवा विषयक तपशिलाचे दस्तऐवजासह न चुकता उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात याव्या.

सध्या राज्यातील कोविड १९ संसर्गजन्य रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कार्यालयीन परिपत्रक क्र.जिपना/साप्रवि/स्था.३/३६०२ दि.१५.०७.२०२० अन्वये निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन समुपदेशनस्थळी करण्याबाबत कर्मचा-यांना योग्य निर्देश देण्यात यावे.

**सहपत्र :-वरील प्रमाणे**

**अति मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपुर**

**प्रतिलीपी :**

१. खाते प्रमुख-------------------------------- (सर्व) जि.प.नागपूर
२. गटविकास अधिकारी प.स. -------------------------- (सर्व)
३. सर्व कार्यालय प्रमुख ------------------------------
उपरोक्त वास्तव्य सेवाजेष्ठता यादयां आपले कार्यालयीन ई-मेल आय डि वर पाठविण्यात आलेल्या आहेत

**अति मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपुर**